# ई निविदा संक्षिप्त जाहिरातीचा नमुना

कार्यालयाचे नांव - पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे कार्यालय

पोलीस अधीक्षक,लोहमार्ग, पुणे हे बंदीगृहातील कच्च्या आरोपींना जेवण पुरविणेबाबतचा ठेका देण्याकरीता मोहोरबंद दरपत्रक मागवित आहेत.

दरपत्रक सादर करण्याची शेवटची तारीख - ३१/०१/२०१९

दरपत्रक उघडण्याची तारीख व वेळ - १०/०२/२०१९ सकाळी ११.०० वाजता

१. दरपत्रक कागदपत्रांचा तपशील www.mahapolice.gov.in व www.punerailway.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. कोणत्याही स्पष्टीकरणाकरीता दरपत्रक धारकांनी दुरध्वनी क्रमांक २५५४१६३१ शी संपर्क साधावा.

३. दरपत्रक पाठविण्यासाठी/पत्रव्यवहारासाठी पत्ता
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे यांचे कार्यालय
संगमब्रिज जवळ, इंजिनिअरिंग कॉलेज शेजारी
पुणे - ४११००१

( तुषार पाटील )
पोलीस अधीक्षक,लोहमार्ग,पुणे

Scanned by CamScanner

# दरपत्रक सुचना

दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०३/२०२० वित्तीय वर्षाच्या मुदतीकरीता पुणे, लोहमार्ग कार्यालयाच्या अखत्यारितील लोहमार्ग पोलीस ठाणे पुणेस्टेशन, दौंड, कुर्डुवाडी, सोलापूर, मिरज, अहमदनगर येथील पोलीस ठाण्यांमधील बंदीगृहातील आरोपींना जेवण पुरविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे.

१) रोजच्या भत्त्याची (जेवणाची) आकारणी खालीलप्रमाणे आहे.

१. सकाळी १०.०० वाजता अटक झाल्यास व संध्याकाळी ६.०० नंतर बंदीत राहिल्यास पुर्ण भत्ता (जेवण)

२. सकाळी १०.०० नंतर अटक झाल्यास व संध्याकाळी ६.०० नंतर बंदीत राहिल्यास ३/४ भत्ता (जेवण)

३. दुपारी १२.०० नंतर अटक झाल्यास व संध्याकाळी ७.०० वाजता नंतर बंदीत राहिल्यास १/२ भत्ता (जेवण)

४. चार तासापेक्षा जास्त परंतु सहा तासापेक्षा कमी वेळ बंदीत राहिल्यास १/४ भत्ता (जेवण)

५. रात्रभरचे कैदी न्यायालया पाठविल्यावर त्यांना जामीन केल्यावर अर्धा भत्ता (जेवण)

६. स्त्री आरोपीजवळ ३ वर्षाखालील मुल असल्यास अर्धा जास्त भत्ता (जेवण) देण्यात यावा व हे जेवण दुधात दिले पाहिजे.

२) खालीलप्रमाणे शिजविलेले अन्न (जेवण) पुरविले जाईल.

| | | |
|---|---|---|
| १. | चपाती/पोळी किंवा भात | ७५० ग्रॅम वजन |
| २. | डाळ | १५० ग्रॅम वजन |
| ३. | भाजी | २०० ग्रॅम वजन |

४. आठवडयातून एक वेळ डाळभाजी ऐवजी मटण १५० ग्रॅम वजन

५. एखाद्या आरोपीने जेवण न घेतल्यास त्यास जेवणा ऐवजी एक लिटर दूध (आजारी असल्यास)

६. सकाळी जेवण १०.०० वाजता

७. सायंकाळी जेवण ०६.०० वाजता

८. पुरविणेत येणार शिजविलेले अन्न (जेवण) शिळे, अस्वच्छ अथवा वजनात कमी नसावे. आरोपीस विषबाधा किंवा विपरित परिणाम झाल्यास कंत्राटदारांना जबाबदार धरले जाईल.

३) वरीलप्रमाणे अनुक्रमांक २ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार जास्तीत जास्त प्रमाणात पुरवठा करणारे ठेकेदार करणारे मान्यता प्राप्त होतील व त्यास दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० पर्यंतचे ठेके दिले जातील.

४) या सुचनेद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, वर नमुद वजनाचे अथवा जास्तीत जास्त अन्न पुरवठा करण्याबाबत दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० पर्यंतच्या मुदतीचे सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे.

५) दरपत्रकधारकाजवळ खाद्यगृह चालविण्याचा चालु वर्षाचा परवाना असणे आवश्यक आहे.

६) दरपत्रक सिलबंद पाकिटात आरोपींना जेवण पुरविण्याचे दरपत्रक पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे यांचे कार्यालय, संगमब्रिज जवळ, इंजिनिअरिंग कॉलेज शेजारी, पुणे ३ ४११००१ यांचे नावे सदरची सुचना प्रसिध्द

Scanned by CamScanner

झाले तारखेपासुन दिनांक ३१/०१/२०१९ पर्यंत पाठवावेत. त्याचप्रमाणे दरपत्रक भरणेसाठी रुपये ५०/- हमीची रक्कम दरपत्रक सोबत पोस्टल ऑर्डरने अथवा मनीऑर्डरने पाठवावीत. उशीरा आलेल्या अथवा हमीची रक्कम न भरलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

७) दरपत्रक या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर दिनांक १०/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. तरी त्या दिवशी दरपत्रक भरणारे इसमास अगर त्यांचे प्रतिनिधीस (अधिकारपत्र धारण केल्यास) स्वखर्चाने हजर राहता येईल. तसेच दरपत्रक संबंधीत सर्व अधिकार पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

८) रुपये ५००/- बयाणा रक्कम कार्यालयात भरुन त्याची पावती दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. जे वरीलप्रमाणे जास्तीत जास्त जेवण प्रतिदिन प्रतिडोई रु. ८०/- प्रमाणे पुरविण्यास तयार आहेत. त्यांना रोजचे जेवण पुरविणेसाठी ठेका देण्यात येईल. तसेच ज्यांना ठेका देण्यात आला त्यांची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन कार्यालयाकडे जमा राहील.समाधानकारक सेवा देऊन ठेका पुर्ण केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येईल. अयशस्वी दरपत्रकांची बयाणा रक्कम ठेका नामंजुर झाल्यास तर तात्काळ परत करण्यात येईल.

( तुषार पाटील )
पोलीस अधीक्षक,लोहमार्ग,पुणे

Scanned by CamScanner